क्रमांक : ९७२६ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ३० ऑगस्ट, २०२४

**संदर्भ : कार्यालयीन आदेश क्र. ८८०९/क-१ दिनांक ६ ऑगस्ट, २०२४**

**: : कार्यालयीन आदेश : :**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतक महोत्सव कार्यक्रमासाठी मंगळवार, दिनांक ३ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रमुख पाहुणे म्हणून भारताच्या माननीय राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. उक्त कार्यक्रमाच्या कामकाजाचा आवाका तसेच कार्यक्रमाच्या कामकाजाकरीता उपलब्ध असलेला अल्प कालावधी लक्षात घेता खालीलप्रमाणे निदेशित करण्यात येत आहे :-

**१) माननीय राष्ट्रपती यांचे संरक्षण व सुरक्षेबाबत राज्यातील पोलीस विभागाच्या व केंद्राच्या संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांची व संबंधित इतर प्रशासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक (Advance Security Liaison Meeting) शनिवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी २.३० वाजता कक्ष क्रमांक ८०१ विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीस समन्वय व नियंत्रण समिती, बैठक व्यवस्था समिती, आहार व्यवस्था समिती, माहिती व तंत्रज्ञान समिती, सुरक्षा व पार्किंग समिती, 'ई-२' (विधानपरिषद विधीविधान) कक्ष, 'ग-२' (सामान्य) कक्ष, 'ल' (जनसंपर्क) व राष्ट्रकुल संसदीय मंडळ कक्ष (CPA), सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य/विद्युत) शाखा यांच्या प्रतिनिधींनी आवश्यक त्या माहितीसह उपस्थित रहावे.**

**२) तसेच संदर्भाधीन आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या उपरोक्त समित्यांवरील सर्व निमंत्रक व सह निमंत्रकांसह समित्यांमध्ये समाविष्ट असलेले अधिकारी/कर्मचारी यांनी संबंधित समित्यांकडे सोपविण्यात आलेल्या कामकाजाच्या अनुषंगाने कामाचा आवाका लक्षात घेता निकडीनुसार उक्त दिवशी कार्यालयात उपस्थित रहावे.**

**३) उक्त कार्यक्रमाच्या पूर्वतयारीकरीता महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय रविवार, दिनांक १ सप्टेंबर, २०२४ रोजी सार्वजनिक/शासकीय सुट्टी असली तरी सुरु राहील.**

आदेशानुसार,

**( सुभाष नलावडे )**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) मा.सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) मा.सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

७) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) सर्व समिती प्रमुख यांची कार्यालये.

९) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

११) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.

१२) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१३) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सदरहू आदेश या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.)

१४) निवडनस्ती.

**प्रतिलिपी :-**

१) उप अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

२) शाखा अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.